# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२
तार : EDUTECH E-mail : desk 4@dte.org.in web : http://www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांक :- ४-४अ/आस्था/२०१४/८७
दिनांक :- 11 MAR 2014

विषय :- **महाराष्ट लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द होणा-या जाहिरातीनुसार अर्ज करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त विविध शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तंत्रनिकेतने यातील अध्यापक तसेच प्रशासकीय पदावर कार्यरत अधिकारी हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द होणा-या जाहिरातीनुसार विविध पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे अर्ज करतात. सदर सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने संचालनालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत संबंधितांकडून मागणी करण्यात येते. अशा प्रकारे संचालनालयास प्राप्त होणा-या अर्जांची संख्या खूप असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी याबाबत असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द होणा-या जाहिरातींमध्ये " महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमून्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन सादर करावा व तसे कार्यालय प्रमुखास कळवावे. तसेच संबंधितांचा अर्ज विचारात घेण्यास काही आक्षेप असल्यास अर्ज करण्याच्या तारखेच्या अंतिम दिनांकापासून ३० दिवसाच्या आत आयोगास तसे परस्पर कळवावे व हरकत नसल्यास तसे कळविण्याची आवश्यकता नाही " अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन कळविण्यात येते की, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / तंत्रनिकेतने येथील शिक्षकीय तसेच प्रशासकीय पदावर कार्यरत अधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द होणा-या जाहिरातींस अनुसरुन आयोगाकडे अर्ज सादर केल्यास त्याची विहीत नमून्यातील प्रत जाहिरातीसह संचालनालयास सादर करावी. त्यास संचालनालयाची / शासनाची हरकत असल्यास त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगास कळविण्याची कार्यवाही करण्यात येईल. हरकत नसल्यास संचालनालयामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही. मात्र संबंधीतांची सदर पदावर निवड झाल्यास हया विभागास शिक्षक / अधिकारी वर्ग यांची आवश्यकता विचारात घेऊन त्यांना नियमानुसार कार्यमुक्त करण्याबाबतची यथास्थिती कार्यवाही करणेसाठी शासनास प्रस्तावित केले जाईल, ही बाब संबंधितांच्या निदर्शनास संस्थास्तरावरुन आणून द्यावी. महाराष्ट्र लोकसेवा आयोगा व्यतिरीक्त इतर आस्थापनेवर अर्ज केल्यास व त्यासाठी संबंधित विभागाने ना-हरकत पत्राशिवाय अर्ज विचारात घेण्यास असमर्थता दर्शविल्यास आवश्यकतेनुसार ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यकत त्या कार्यवाहीकरीता :-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये
२. सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

त्यांना कळविण्यात येते की, त्यांचे आस्थापनेवर कार्यरत अधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत देण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केला असल्यास, सदर अर्जाची व जाहिरातीची प्रत विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करावी व आपल्या कार्यालयात जतन करावी. तसेच संबंधितांना अर्ज सादर केल्याची पोच जतन करण्यास सूचित करावे.

आस्था -१ विभागप्रमुख - यंत्र / स्थापत्य / अणुविद्युत / संगणक / रसायन / उपयोजित / कर्मशाळा / उपयोजित विज्ञान
यांना माहिती साठी पृष्ठांकित करावे.
15-07-2014

E:\Gauri\Circular.doc